<u>सं. फौ. ख. क्र.८५९/२०२१</u>                    निशाणी क्र.२६

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – दत्ताराव विश्वनाथ माळी

वय – ४५ वर्षे,                    व्यवसाय – पोलीस पाटील,

पत्ता – रा. बाकराबाद, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी बाकराबाद गावामध्ये पोलीस पाटील म्हणून कार्यरत आहे. दि.२७.०१.२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास मला माहिती मिळाली की, रायभान इरभान माळी हे गाडीखाली पडून मरण पावलेले आहेत. त्यानुसार मी आमच्या गावातील पाण्याच्या टाकी येथे गेलो. त्या ठिकाणी बरीच गर्दी जमलेली होती तेथे रायभान माळी यांचा मुलगा सचिन माळी यानी मला सांगितले की, टाटा एस वाहन नितीन भाकरे चालवित होता. त्यांनी गाडी निष्काळजीपणे रिव्हर्स घेत असताना त्यांच्या गाडीखाली आले. सदर घटनेची माहिती मी पो.स्टे. येथे कळविली. सदर टाटा एस वाहनाचा क्र. एमएच३०–ए.बी.–०५९४ असा होता. सदरची गाडी नितीन भाकरे चालवित होता. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. एन. जामोदे यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, रायभान माळी हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सचिन माळी याच्या सांगण्याप्रमाणे मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १९.०९.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE Date: 2025.09.19 12:44:06 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | १९/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १९/०९/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १९/०९/२०२५ |